पुस्तकाचे नाव - छेलबटाउ मोहनाराणीची लावणी

लेखकाचे नाव - कदम सातारकर शिवराम नाना

प्रकाशक - श्रीकल्पतरु छापखाना, मुंबई

प्रकाशन वर्ष - १८९४

किंमत - २ आणे

पृष्ठसंख्या -१६

सारांश -

मोहनाराणी, तिचा प्रियकर छेलबटाउ आणि तिचा राजा पती यांच्यातील गोष्ट या पुस्तकात लावणीच्या रूपात मांडली आहे. राजा बारा वर्षे युद्धावर गेला असल्याने राणी तिच्या प्रियकरला महालात बोलावून घेते. राजा परत आल्यावर संशयाने छेलबटाउला ठार मारतो. त्यावर सत्य बाहेर येऊ नये म्हणून राणी तो आपल्या बहिणीचा पती होता असे सांगून पापाचे प्रायश्चित्त म्हणून त्याच्याबरोबर सती जाते.

त्याच्या कृत्याचा पश्चाताप व राणीच्या विरहाचे दु:ख सहन न होऊन राजा तप करतो. श्रीशंकर त्याच्यावर प्रसन्न होतात आणि मोहनाराणीची दोन रूपे व छेलबटाउला जिवंत करतात. एक मोहनाराणी राजाबरोबर तर एक छेलबटाउबरोबर असे सुखाने नांदतात - अशी ढोबळमानाने कथा आहे. पद्यरूपात कथा असूनही काव्याच्या गेयतेने पुस्तक वाचनीय होते.

शीर्षकपानाची प्रतिकृती



देणगी दाखल सप्रेम भेट.

श्री

# छेलबटाऊ मोहनाराणीची लावणी.

हें पुस्तक

**शिवराम नाना कदम सातारकर**

यांनीं

मुंबईंत 'श्रीकल्पतरु' छापखान्यांत छापिलें.

शके १८१६ सन १८९४.

किंमत २ आणे.